महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ९वा मजला,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई-४०० ००१.

दुरध्वनी क्र.२२७१९४७१ E-mail: medd.adhiniyam@gov.in

क्रमांक- परावै-०९२३/प्र.क्र. १००/अधिनियम, दिनांक: १३ सप्टेंबर, २०२३.

प्रति,

प्रबंधक,
महाराष्ट्र परावैद्यक परिषद,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,
चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.

विषय : MSBVEE अभ्यासक्रमाच्या प्रलंबित नोंदणी प्रक्रियेबाबत..
संदर्भ : १. आपले पत्र क्र. मपवैप/ MSBVEE/२९७/२०२३, दि. ०६.०९.२०२३

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ च्या कलम २६ नुसार अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही मान्यताप्राप्त परावैद्यक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तीस महाराष्ट्र परावैद्यक परिषदेत नोंदणी (Registration) देण्यात येते.

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या Diploma in Medical Laboratory Technician हा अभ्यासक्रम तसेच उक्त अधिनियमासोबतच्या सुधारित अनुसूचीच्या भाग-ई (Part-E) मध्ये अ.क्र. १ येथे नमूद Diploma in Paramedical Technology (Medical Laboratory Technology) (Laboratory Technician) हे दोन्ही अभ्यासक्रम कलम २(घ) मधील परावैद्यकीय अर्हतांच्या व्याख्येत येत असल्याने तसेच ते शासन मान्यताप्राप्त परीक्षा मंडळाकडून चालविण्यात येत असल्याने सदर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडून नोंदणी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

२. तसेच, शासन मान्यताप्राप्त विविध विद्यापीठांकडून/ मंडळांकडून राबविण्यात येणारे तथापि, परिषदेच्या अधिनियमासोबतच्या अनुसूचीमध्ये समाविष्ट नसलेले परावैद्यक अभ्यासक्रम अधिनियमाच्या अनुसूचीत समाविष्ट करण्याबाबत सविस्तर प्रस्तावही दि. ०३.१०.२०२३ पर्यंत शासनास सादर करावा.

(वैशाली सुळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत - १. संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,मुंबई.
२. निवडनस्ती, अधिनियम.